# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १६/०७/२०२४ (मंगळवार) दुपार**

---

## अवैध दारूची तस्करी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध धडक मोहीम

दिनांक १५/०७/२०२४ रोजी पोस्टे केळवद येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता ढालगावखैरी_येथे राहणारा **आरोपी नामे – श्याम देवाजी नारनवरे, वय ४२ वर्ष रा. ढालगावखैरी ता. सावनेर** हा देशी दारू बाळगुन विक्री करतांना मिळून आल्याने त्याचे घराची घरझडती घेतली असता पहील्या रूममध्ये लाकडी पलंगाचे बाजुला एका कोप–यात एका थैलीत प्रत्येकी ९० मिली देशी दारू ने भरलेल्या ८० प्लॉस्टीक सीलबंद बॉटल प्रत्येकी ३५ रू प्रमाणे २८०० रू २) प्रत्येकी १८० मिली देशी दारूने भरलेल्या १५ प्लास्टीक सीलबंद बॉटल प्रत्येकी १०५० रू असा एकुण ३८५० रू चा मुद्देमाल विनापरवाना विक्री करिता बाळगताना मिळुन आल्याने जप्त करून आरोपीविरूद्ध कलम ६५ ई मदाका प्रमाणे कारवाई करण्यात आली.

दिनांक १५/०७/२०२४ रोजी पोस्टे मौदा येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता मुखबिरद्वारे खबर मिळाली की, सावळी फाटा जवळ बंद दुकानात आरोपी अशोक सुर्यभान बारसागडे वय ४७ वर्ष, रा. सावळी ता. कामठी जि. नागपूर हा अवैधरीत्या दारूची विक्री करीत आहे. अशा मिळालेल्या माहिती वरून नमुद घटनास्थळी रेड कारवाई करून आरोपीचे जवळ असलेल्या काळया पिशवीची पाहणी केली असता पिशवीमध्ये ११ निपा एकूण १९८० एम एल देशी दारू प्रत्येकी निप कि. ७० रू प्रमाणे एकूण ७७०/– रू चा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध कलम ६५ ई मदाका प्रमाणे कारवाई करण्यात आली.

दिनांक १५/०७/२०२४ रोजी पोस्टे जलालखेडा येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता यातील **आरोपी नामे– अमीत इंग्रज गुजवार वय २५ वर्ष रा. घोगरा ता. नरखेड** हा घोगरा ता. नरखेड येथे मोहाफुल दारूची विक्री करताना मिळुन आल्याने त्याचे ताब्यातून ०५ लिटर मोहाफुल गावठी दारु प्रती लिटर ५०/– रुपये प्रमाणे किंमती २५०/– रु. चा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध कलम ६५ ई मदाका प्रमाणे कारवाई करण्यात आली.

दिनांक १५/०७/२०२४ रोजी पोस्टे काटोल येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता यातील मोसा. क्र. एम. एच ३१/डीडी– ५४५९ चा चालक **आरोपी नामे– जसबिर सिंग भोंड वय ४० रा. सरदार मोहल्ला काटोल नायगाव (चिचाळा) जि.प. शाळेसमोर** हा नायगाव (चिचाळा) जिल्हा परीषद शाळेसमोर मोहाफुल गावठी दारूची विक्री करताना मिळुन आल्याने आरोपीकडुन ०८ लिटर मोहाफुल गावठी दारू कि. ४०० रू व मो. सा. क्र. एमएच ३१/डीडी ५४५९ कि. ५०,०००/–रू असा एकुण ५०,४००/–रू चा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध कलम ६५ ई, अ मदाका प्रमाणे कारवाई करण्यात आली.

दिनांक १५/०७/२०२४ रोजी पोस्टे भिवापूर येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता मुखबिरद्वारे खबर मिळाली की, आरोपी राजेश पुरूषोत्तम पाटील वय ५१ वर्ष रा. सिध्दार्थ नगर ता. भिवापुर हा दारू बाळगुन त्याची विक्री करीत आहे. अशा खबरेवरून रेड कारवाई करून आरोपी जवळ असलेल्या नायलॉनची थैलीची पाहणी केली असता सदर थैलीमध्ये ०९ देशी दारू संत्रा कोकण ९९९ च्या निपा १८० एम एल नी भरलेले प्रत्येकी किं

७०/— रू प्रमाणे असा एकुण ६३०/.— रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध कलम ६५ ई मदाका प्रमाणे कारवाई करण्यात आली. तसेच **आरोपी ताराचंद गोमाजी मंडपे वय ७० वर्ष रा. भगवानपुर ता भिवापुर जि नागपुर** हा दारू बाळगुन त्याची विक्री करताना मिळुन आल्याने आरोपीचे ताब्यातून ०८ देशी दारू संत्रा कोकण ९९९ च्या निपा प्रत्येकी १८० एम एल नी भरलेले प्रत्येकी किं ७०/— रू प्रमाणे असा एकुण ५६०/— रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध कलम ६५ ई मदाका प्रमाणे कारवाई करण्यात आली.

## पो.स्टे. बुट्टीबोरी हद्दीमधील सट्टापट्टी लिहणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

दिनांक १५/०७/२०२४ रोजी पोस्टे बोरी येथील स्टाफ पोस्टे बोरी परीसरात पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरद्वारे विश्वसनीय खबर मिळाली की, एक इसम हा मौजा बुट्टीबोरी मटन मार्केटचे मागे सार्वजनिक ठिकाणी अवैधरीत्या सट्टापट्टीवर लोकांकडुन पैसे घेवुन सट्टापट्टीचे आकडे लिहुन जुगाराचा खेळ खेळवत आहे. अशा माहिती वरून बुट्टीबोरी येथील मटन मार्केटचे मागे सापळा रचुन छापा टाकुन **आरोपी नामे—शरद श्रीरामजी खोब्रागडे वय 48 वर्ष रा इंद्र नगर बौध्द विहारजवळ, पोस्ट केळझर तह. सेलु वार्ड नं. 05 केळझर जि. वर्धा ह. मु. हनुमान नगर बुट्टीबोरी तह. जि. नागपूर** हा सट्टापट्टीचे आकडे लिहताना मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्याची झडती घेतली असता १) पांढ—या रंगाच्या कागदी चिठ्ठीवर आकडे लिहीलेले कागद, ०२) एक डॉट पेन निळया शाईचा ०३) नगदी १४७० रू असा एकुण १४७० रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूध्द पोलीस ठाणे बोरी कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा.), मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा.) यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे बोरी येथील ठाणेदार ह्रदयनारायण यादव, पोशि दशरथ घुगरे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर